सोलापुर महानगरपालिका, सोलापुर
"इंद्रभुवन" पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर – ४१३ ००१

## Expression Of Interest

सोलापूर शहरात VMS (Variable Messenger System) व अनुषंगिक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संरचना उभारणे व त्यापासुन उत्पन्नाचे स्त्रोत उभारण्याकरिता इच्छुक व पात्र संस्था/जाहिरात एजन्सी/CSR संस्थांकडून Expression of Interest (EOI) मागविण्यात येत आहे. तरी अनुभवी अभिकर्ते, इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी दि.०५/१२ / २०२५ अखेर कार्यालयीन वेळेत भुमी व मालमत्ता विभागाकडे बंद लिफाफ्यामध्ये आपले अर्ज सादर करावे. EOI बाबतची संपुर्ण माहिती हि आपणास www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

टीप :

१. हि जाहिरात फक्त EOI मागविण्यापुरती असुन, यामधुन कोणत्याही प्रकारे थेट कामगिरीचे / कंत्राटाचे आश्वासन दिले जात नाही.
२. अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र (असल्यास), बँक खात्याचा तपशील, मागील ०३ वर्षाचे आयकर विवरण प्रमाणपत्र, सहभागी होणेकामी र.रु.५०००/- प्रवेश फी भरुन त्याची पावती व र.रु.५०,०००/- चे डिमांड ड्राफ्ट सादर करावे.
३. कोणतेही अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार मा.आयुक्त, सो.म.पा. यांनी राखुन ठेवला आहे.
४. अर्ज दाखल झालेनंतर मा.आयुक्त यांचे आदेशानुसार पुढील उचित कार्यवाही ठेवणेत येईल.

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.

## Expression of Interest (EOI)

Terms & Conditions (अटी व शर्ती)

१. सोलापूर शहरात VMS (Variable Messenger System) व अनुषंगिक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संरचना उभारणे व त्यापासुन उत्पन्नाचे स्त्रोत उभारण्याकरिता इच्छुक, सक्षम व अनुभवी संस्था/एजन्सी/कंपन्यांकडून प्राथमिक माहिती आणि क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी राबविलेली आहे. या EOI द्वारे कोणताही करार / कामादेश नोंदविला जात नाही.

२. पात्रता निकष (Eligibility Criteria)

१. अर्जदार संस्था/एजन्सी विधिसम्मत नोंदणीकृत असावी.
२. संस्था किमान 2 वर्षे डिजिटल मीडिया / डिजिटल सिग्नेज / जाहिरात/शहर सुशोभीकरण क्षेत्रात कार्यरत असावी.
३. अर्जदाराकडे किमान **दोन समान प्रकारच्या कामांचा अनुभव** असावा (सरकारी/खासगी).
४. PAN, GST नोंदणी आवश्यक.
५. आर्थिक क्षमता दर्शविण्यासाठी मागील ०१–०३ वर्षांची आर्थिक कागदपत्रे (ITR/Balance Sheet) सादर करावीत.

मनपाला आवश्यक असल्यास अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करण्याचा अधिकार आहे.

३. EOI सादर करण्यासाठी **आवश्यक कागदपत्रे**

१. संस्थेचा परिचय व नोंदणी प्रमाणपत्रे
२. अनुभव पत्रे / पूर्ण केलेल्या कामांची यादी
३. प्रस्तावित स्थळांची यांदी (जर असेल तर)
४. वापरण्यात येणाऱ्या डिजिटल माध्यमांची माहिती
   - तांत्रिक वैशिष्ट्ये
   - आकार, ऊर्जा वापर, टिकाऊपणा
५. कार्यपद्धती व अंमलबजावणी कालावधी
६. महसुली मॉडेल (CSR/PPP/Advertisement Rights)
७. अधिकृत स्वाक्षरीसह अर्जपत्र
८. कंपनी कायदेशीर जबाबदारी स्वीकारण्याचे पत्र

४. **कामाचे स्वरूप** (Scope of Work)

१. मंजूर ठिकाणी डिजिटल डिस्प्ले / LED स्क्रीन / डिजिटल सिग्नेज / माहिती बोर्ड बसवणे.

२. उपकरणांची स्थापना, वायरिंग, देखभाल, दुरुस्ती, तांत्रिक कार्ये संस्था स्वतः करेल.
३. सार्वजनिक हिताचे संदेश, वाहतूक सूचना, मनपा संदेश, आपत्ती व्यवस्थापन संदेश इत्यादी प्रदर्शित करणे आवश्यक.
४. जाहिरात / माहिती प्रदर्शित करताना मनपाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करणे.
५. उपकरणांची देखभाल व सतत कार्यरत ठेवणे हे संस्थेची जबाबदारी.

**५. परवानग्या व नियम**

१. सर्व आवश्यक परवानग्या (वाहतूक पोलीस, विद्युत विभाग इ.) घेण्याची जबाबदारी संस्था/एजन्सीची राहील.
२. स्थापना करताना मनपा/वाहतूक विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन बंधनकारक.

**६. निवड प्रक्रिया (Evaluation Process)**

१. प्राप्त EOI ची छाननी समितीद्वारे (मनपा अनुमोदित) केली जाईल.
२. तांत्रिक पात्रता, अनुभव, प्रस्तावित तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन क्षमतेनुसार संस्थांची प्राथमिक निवड केली जाईल.
३. मनपा इच्छेनुसार पुढील टप्प्यात Tender/RFP प्रक्रिया राबवू शकते.
४. EOI सादर केल्यामुळे कोणताही कराराचा किंवा आर्थिक दायित्वाचा हक्क निर्माण होत नाही.

**७. जाहिरात हक्क (Advertising Rights)**

१. जाहिरात प्रदर्शित करण्याचा अधिकार मनपा धोरणानुसारच दिला जाईल.
२. सार्वजनिक हिताचे संदेश / मनपा संदेश निश्चित वेळेनुसार प्रदर्शित करणे अनिवार्य.
३. कोणत्याही प्रकारची आक्षेपार्ह, भ्रामक, राजकीय, धार्मिक किंवा कायद्याचे उल्लंघन करणारी जाहिरात परवानगीशिवाय प्रदर्शित करता येणार नाही.

**८. आर्थिक अटी (Financial Terms)**

१. स्थापना व देखभालीचा सर्व खर्च संस्था/एजन्सीकडून केला जाईल (CSR/PPP/Advertisement model नुसार).
२. मनपावर कोणताही आर्थिक भार येणार नाही (जर वेगळे नमूद नसल्यास).
३. महसुली मॉडेलमधील मनपाचा वाटा पुढील RFP/Tender मध्ये निश्चित केला जाईल.

**९. उपकरणांच्या गुणवत्तेबाबत अटी**

१. स्थापित करण्यात येणारे सर्व उपकरणे ISI/IEC मानकांनुसार असावीत.
२. वॉरंटी किमान 2 वर्षे आवश्यक.
३. खराब झाल्यास 72 तासांत **दुरुस्ती/बदलणे** आवश्यक.

**१०. जबाबदारी व दायित्व (Liability)**

१. स्थापनेदरम्यान होणाऱ्या कोणत्याही अपघातास संस्था स्वतः जबाबदार असेल.
२. मनपावर कोणतेही कायदेशीर/आर्थिक दायित्व येणार नाही.

११. कराराशी संबंधित अटी

१. या EOI नंतर निवड झालेल्या संस्थांसोबत मनपा करार / MOU करेल.

२. करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास मनपाला करार रद्द करण्याचा अधिकार राहील.

१२. मनपाला राखीव अधिकार

१. मनपाला कुठलीही कारणे न देता EOI प्रक्रिया थांबवण्याचा / रद्द करण्याचा अधिकार आहे.

२. मनपाला कोणतेही स्पष्टीकरण देणे बंधनकारक नाही.

३. मनपा आवश्यक तेथे अटी/शर्ती बदलू शकते.

१३. इतर सामान्य अटी

१. EOI लिफाफ्यावर "EOI for Digital Media Beautification – SMC" असा स्पष्ट उल्लेख आवश्यक.

२. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त EOI विचारात घेतले जाणार नाहीत.

३. सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व पडताळणीयोग्य असावीत.

४. चुकीची/भ्रामक माहिती दिल्यास संस्था अपात्र ठरेल.

(आशिष लोकरे)
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
जाहिरात व परवाना विभाग, सो.म.पा.